जा.क्र. धा.आ.:रू. 2316/2020
धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय
धर्मादाय आयुक्त भवन, ३ रा मजला
८३, डॉ. अॅनी बेसंट रोड
वरळी मुंबई ४०००१८

# परिपत्रक क्रमांक 581 दि. 25 /09/2020

असे निदर्शनास आले आहे की, वारंवार सुचना देवूनही धर्मादाय रूग्णालये बेड उपलब्धतेची दैनंदीन माहिती charity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अद्ययावत करीत नाहीत.

करीता प्रत्येक कार्यालयातील रूग्णालय निरिक्षक यांनी धर्मादाय रूग्णालयांची सर्वंकष माहीती धर्मादाय संघटनेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत केली जात आहे किंवा कसे या बाबत दररोज तपासणी करून (सोबत जोडलेल्या तक्त्या प्रमाणे ) रेकॉर्ड तयार ठेवावे आणि संबंधीत सहाय्यक धर्मादाय आयुक्त (रूग्णालय) यांचेकडे दर शुक्रवारी अहवाल सादर करावा.

संकेतस्थळावर माहिती अद्यावत न करणा-या अशा धर्मादाय रूग्णालयांविरूद्ध संबंधीत सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे मार्फत कायदेशीर कारवाई करावी. माहिती अद्ययावत न करणा-या रूग्णालयांची माहिती व त्यांचेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दर सोमवारी संबंधीत धर्मादाय सह आयुक्त यांना त्यांच्या कार्यालयीन ई-मेल आयडीवर पाठविण्यात यावा.

वरील प्रमाणे कामकाजासाठी आपल्या कार्यालयांतील अधिक्षक रूग्णालय यांनी समन्वयक म्हणुन कामकाज करावे. धर्मादाय रूग्णालयांची संकेतस्थळावरील व कार्यालयातील माहिती अद्ययावत ठेवण्यासाठी अधिक्षक रूग्णालय हे जबाबदार असतील.

धर्मादाय सह आयुक्त यांनी मॉनिटरींग कमीटी च्या बैठका नियमीत घेवून तपशील अद्ययावत ठेवावा. या सोबत दिलेल्या तक्त्या प्रमाणे excel फॉरमॅट मध्ये माहिती नेहमी अद्ययावत ठेवावी व दर महिन्याचे 1 तारखेला मुख्यालयांस पाठविण्यात यावी तसेच वेळोवेळी मागणी केल्यानुसार संबंधीत विभागाची अद्यायावत माहिती तात्काळ मुख्यालयांस पुरविण्यात यावी.

( रा. न. जोशी)
धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

स्थळः- मुंबई